दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.१४ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 14 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 228 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# पिस्तुल्या सगळ्यांसोबत तरीही लक्ष्य कर्तव्यदक्ष खासदार बजरंग सोनवणेकडे!



बीड । प्रतिनिधी

एका बीयरबारमध्ये मद्यपान करत असताना अनधिकृत पिस्तूल दाखवणाऱ्या व्यक्तीचे स्थानिक भाषेत 'पिस्तुल्या' यांचे अनेक राजकीय नेत्यांसोबतचे फोटो काढलेले आहेत . या व्यक्तीचा संबंध असंख्य राजकीय मंडळींशी असताना, कर्तव्यदक्ष खासदार बजरंग सोनवणे यांना बदनाम करण्याचा केविलवाणा प्रयत्न पेड न्यूज करणाऱ्या पोर्टलधारी पत्रकारांकडून सुरू झाला आहे.संबंधित व्यक्तीचे फोटो केवळ खासदार बजरंग सोनवणे यांच्यासोबत नव्हे, तर अनेक राजकीय व्यक्तींशी आहेत. मात्र, काही पोर्टल पत्रकारांनी खासदार सोनवणे यांच्याच कार्यकर्त्याशी संबंध असल्याचे भासवणाऱ्या भ्रामक पोस्ट सोशल मीडियावरून प्रसारित करत बदनामी करण्याचे षड्यंत्र रचले आहे.संपूर्ण प्रकरणाचा विचार करता, हा प्रकार राजकीय हेतुपुरस्सर आणि सुनियोजित बदनामी मोहीम असल्याचा स्पष्ट संशय उपस्थित होत आहे. केजमधून बीड जिल्ह्याचे पारदर्शक नेतृत्व करणारे खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे गेल्या अनेक वर्षांपासून सर्वसामान्य जनतेसाठी कार्यरत असून त्यांच्या कार्यक्षमतेवर जनतेचा पूर्ण विश्वास आहे.

या प्रकरणी सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अफवांमध्ये पेड न्यूज पोर्टल्सचा हात असून, पत्रकारितेच्या मूल्यांना कालिमा फासणाऱ्या अशा पत्रकारांची चौकशी व कारवाई व्हावी, अशी मागणी जनतेतून केली जात आहे.दरम्यान, हा प्रकार निव्वळ दुष्प्रचार असून, सत्य परिस्थिती उघड करण्यासाठी प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी त्यांच्या समर्थकांकडून जोर धरू लागली आहे.




पिस्टलचे हातात घेऊन सोशल मीडियावर स्टेटस ठेवणाऱ्या चौघा विरुद्ध गुन्हा दाखल विनापरवाना आणि धाक निर्माण करण्याच्या उद्देशाने अनधिकृतपणे पिस्टल सारखे अग्नीशस्त्र हातात घेऊन त्याचे फोटो सोशल मीडिया वरून व्हायरल करणाऱ्या चौघां विरुद्ध केज पोलिसांनी कारवाई करून, गुन्हा दाखल करून तिघांना ताब्यात घेतले आहे.

या बाबतची माहिती अशी की, सोशल मीडियाच्या व्हाट्सअप स्टेटसवर पिस्टल सारखे अग्नी शस्त्र हातात घेऊन त्या द्वारे दहशत निर्माण करून धाक बसविण्यासाठी ते फोटो व्हायरल केल्या प्रकरणी केज पोलिसांनी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली. या प्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल उमेश आघाव यांच्या तक्रारी वरून गणेश अर्जुन मुंडे, रामदास जगन्नाथ मुंडे, पांडुरंग रामा मुंडे (सर्व रा. देवगांव ता. केज जि. बीड) आणि रामचंद्र परसराम ओमासे (रा. बेडा ता. जि. सांगली) या चौघा विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु. र. नं. ३८०/२०२५ भा. न्या. सं. ३५३ आणि शस्त्र अधिनियम ३/२५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, हेडकॉन्स्टेबल उमेश आघाव, रशीद शेख यांनी गणेश अर्जुन मुंडे, रामदास जगन्नाथ मुंडे, पांडुरंग रामा मुंडे या तिघांना ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राजू वाघमारे हे तपास करीत आहेत.या गुन्ह्यात ताब्यात घेतलेल्या आरोपीकडे चौकशी केली असता सदर फोटो त्यांनी सांगली जिल्ह्यातून सोशल मीडियावर व्हायरल केले असल्याची माहिती मिळते. या गुन्ह्यातील आरोपी रामचंद्र परसराम ओमासे (रा. बेडा ता. जि. सांगली) याला अद्याप ताब्यात घेतले नसून शस्त्र देखील हस्तगत करण्यात आलेले नाही.

**पोर्टलवर खा. बजरंग सोनवणे यांची बदनामी करणाऱ्याच्या विरोधात पुराव्यासकट मा . जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार आहे.**
**शिवाजी चौधरी**
**ता. अध्यक्ष बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळ**

**यापुढे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांची बदनामी सहन करून घेतली जाणार नाही. बदनामी करू पाहत असणाऱ्या वरती योग्य कारवाई करण्यासाठी निवेदन दिले जाईल.**
**-पिंटु ठोंबरे,माजी प.स. सदस्य**

**बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष खा . बजरंग सोनवणे यांचा कांही शोसल पोर्टल पत्रकारधारी अनाधिकृत बातम्या पसरून बदनाम करण्याचे काम करत असल्यामुळे संबंधितावर गुन्हे दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात ठाण बसो अंदोलन करणार आहे.**
**-कपिल मस्के,शहराध्यक्ष**
**बजरंग बप्पा मित्र मंडळ केज**

## सार्वजनिक स्मशानभूमीत अस्ती विसर्जन करून वृक्षारोपणाचा सामाजिक संदेश

### मृत्यूच्या ठिकाणी जीवनाचा अंकुर; मस्के परिवाराचा स्तुत्य उपक्रम





केज । प्रतिनिधी

मृत्यूची नोंद करणाऱ्या स्मशानभूमीत जीवनाची नवी पालवी फुलवण्याचा एक सामाजिक व संवेदनशील उपक्रम केजमध्ये पार पडला. फुले नगर येथील स्मृतिशेष कस्तुरबा तुकाराम मस्के (वय ८२) यांचे वृद्धपकाळाने दि. ११ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांच्यावर दि. १२ जुलै रोजी दुपारी ११ वाजता क्रांतीनगर, केज येथील सार्वजनिक स्मशानभूमीत बौद्ध पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले.

अंत्यसंस्कारानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजेच दि. १३ जुलै रोजी रक्षा सावडण्याचा कार्यक्रम पार पडला. यानंतर, स्मशानभूमीतच मृतात्म्याच्या स्मरणार्थ अस्ती विसर्जन करून तेथे एक मोठे प्रा. भालेराव सर यांच्या हस्ते आंब्याचे झाड लावण्यात आले. हा उपक्रम मस्के परिवाराच्या वतीने तसेच केज नगरपंचायतीचे नगरसेवक कपिल मस्के यांच्या पुढाकाराने राबवण्यात आला.

हा उपक्रम केवळ निसर्ग रक्षणाचा नव्हे, तर मृत्यूच्या ठिकाणीही जीवन फुलवण्याचा सकारात्मक संदेश देणारा ठरला आहे. मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या आठवणींना जिवंत ठेवण्याची ही अभिनव पद्धत केज परिसरात कौतुकास्पद ठरली आहे.

स्मशानभूमीत लावलेले हे झाड केवळ एक रोप नाही, तर ती दिवंगत व्यक्तीच्या जीवनमूल्यांची आठवण जपणारी जिवंत स्मृती आहे, असे मत उपस्थीत नागरिकांनी यावेळी व्यक्त केले.

अशा उपक्रमांमधून पर्यावरण संवर्धनाबरोबरच भावनिक जडणघडीलाही नवा आयाम मिळत असून, मस्के परिवाराचा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याची अफाट क्षमता-डॉ.ओमप्रकाश शेटे

**दिंद्रुड (प्रतिनिधी)**-ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याची अफाट क्षमता असल्याचे प्रतिपादन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. देवदूत प्रतिष्ठान, दिंद्रुड यांच्या वतीने नीट (छएएढ) परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच पार पडला, यावेळी ते बोलत होते. ग्रामीण भागात राहूनही शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करणाऱ्या २० गुणवंत विद्यार्थ्यांचा व जलसंपदा विभागात निवड झालेल्या शेतकऱ्याच्या मुलीचा तसेच एमबीबीएस शिक्षण पूर्ण झालेल्या दोन डॉक्टरांचा पालकांसह यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व्यंकटेश चामनर, डॉ. प्रा. रमेश गटकळ, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, नगरसेवक बालाजी चव्हाण, सुभाष सोळंके, संजीवनी राऊत, सरपंच भगवान कांदे, उत्तरेश्वर खताळ, बद्रीनाथ व्हरकटे, सुहास लंगडे आदि मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी केले.



तर विद्यार्थ्यांच्या वतीने कु. प्रियंका गौंडर हिने मनोगत व्यक्त करत आपल्या यशामागे असलेल्या शिक्षकांचे, पालकांचे व समाजाचे योगदान अधोरेखित केले.डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की,या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात राहूनही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत यश मिळवले आहे, हे अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यांच्या या यशामधून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये छएएढ सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याची अफाट क्षमता आहे, गरज आहे ती योग्य मार्गदर्शन व संधीची. पालक प्रतिनिधी म्हणून डॉ. विष्णू तिडके यांनी भावना व्यक्त करत, अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते असे मत मांडले.यावेळी मंगेश शिवाजी हंगरगे, अक्षय रमेश काटकर, चि.शिवानंद विष्णू तिडके, कु.प्रणिता संतोष शिंदे, चि.करण नामदेव वणवे, कु.योगिनी युवराज ठोंबरे, चि.जयंत अशोक काशीद, कु.ऐश्वर्या वैजनाथ कोथिंबिरे, चि.राहुल मारोती देशमुख, शिरसे प्रतिभा चंद्रकांत, उमेश मुकाराम ठोंबरे, कु.साक्षी मनोहर देशमाने, चि.दिग्विजय बंडूजी खांडेकर, कु.जयश्री लक्ष्मण कुकडे, कु.अनुराधा गणेश ठोंबरे, कु.प्रीती अर्जुन काटे, चि.आदित्य अनिल खडके, कु.राधा राम सोनूळे, चि.ओंकार सतीश कांदे यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. नीट परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या सर्व भावी डॉक्टरांना शाल, श्रीफळ, पुष्पहार व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवदूत प्रतिष्ठानचे सचिव शिवाजी हंगरगे, नागेश कानडे, गणेश काटकर, बाबा कांबळे, रंगनाथ सोळंके, एकनाथ हंगरगे, बालाजी काचगुंडे, ज्ञानेश्वर ठोंबरे, आदींनी मेहनत घेतली. देवदूत प्रतिष्ठान हे संस्थात्मक पातळीवर आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असून, अशा उपक्रमातून नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे कार्य प्रतिष्ठान करीत असल्याचे गौरवोद्गार उपस्थित मान्यवरांनी काढले.

## जि.प.,पंचायत समितीच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना होणार सोमवारी प्रसिद्ध




बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रारूप प्रभाग रचनेची परिशिष्ट ५ (अ) व परिशिष्ट ५ (ब) अधिसूचना सोमवार, १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी,जिल्हा परिषद,जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर आणि बीड जिल्हा सूचना विज्ञान केंद्राच्या (छखउ) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. असे उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी कळवले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा युवक कार्याध्यक्ष पदी ॲड.प्रशांत पवार यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

आगामी नगरपंचायत, नगरपालिका,जिल्हा परिषद,पंचायत समिती च्या होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता सर्व पक्षाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यात बीड जिल्ह्यात युवकांचे मोठे संघटन असणारे ड.प्रशांत पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी नियुक्ती करत जिल्ह्यात युवकांचे मोठे संघटन उभा केले आहे.

ड.प्रशांत पवार यांनी लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकी मध्ये निष्ठावंत म्हणून उल्लेखनीय काम केल्याबद्दल त्यांच्या कामाची पावती म्हणून तसेच युवकांचे संघटन व तालुक्यातील युवकांची मोठी बांधणी पाहून पक्षाचेप्रदेशाध्यक्ष जयंत पाटील,तथा युवकांचे प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख यांनी जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी दिली असल्याचे बोलले जात आहे.बीड जिल्हा युवक कार्याध्यक्ष पदी नियुक्ती केल्याबद्दल पक्षाचे अध्यक्ष



**येणाऱ्या काळात शिव,शाहू, फुले,आंबेडकर,आण्णाभाऊ यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी व शरदचंद्रजी पवार यांचे विचार युवकां पर्यंत पोहचवण्याचे काम प्रामाणिकपणे करत राहील -ॲड.प्रशांत पवार**

खा.शरदचंद्रजी पवार,खा.सुप्रियाताई सुळे,प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील,खा. बजरंग बप्पा सोनवणे, मा.आमदार पृथ्वीराज साठे,डॉ.नरेंद्र काळे, राजेभाऊ फड,व्यंकटेश चामणर,अमर भैय्या देशमुख,अंकुशराव ढोबळे या सर्वांचे आभार मानले आहेत.

## सूर महाराष्ट्र पर्व सहा मराठी गाण्याच्या नाशिक येथे संपन्न झालेल्या स्पर्धेत अभय जोशी यांना विशेष सन्मान पत्र देऊन गौरव



अंबाजोगाई । प्रतिनिधी

सूर महाराष्ट्र पर्व ६ ही मराठी गाण्यांची स्पर्धा नाशिक येथे झाली.ही स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली होती.या मध्ये महाराष्ट्र राज्य आणि इतर राज्या तील ३०० गायक स्पर्धकांनी भाग घेतला होता.यामध्ये अंबाजोगाई येथील पत्रकार अभय जोशी यांना विशेष सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले

गुरुपौर्णिमा निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे श्रध्दा स्थान तालमार्तंड प्रकाशजी बोरगावकर गुरुजी यांचे गुरुपूजन सोहळा अंबाजोगाई येथे मुकुंदराज सभागृहात संपन्न झाला यावेळी उपजिल्हाधिकारी श्री. दिपक वजाळे, नंदकिशोर मुंदडा, तालमार्तंड प्रकाशजी बोरगावकर आणि मान्यवरांच्या हस्ते अभय जोशी यांना विशेष सत्कार करून सन्मानित करण्यात आले.त्यासाठी त्यांना कौतुक करून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

संपादकीय

# जास्वंदीचा बहर

पानगळीच्या सुरुवातीच्या दिवसांत पानांवर दिसून आलेले बदल झाडापर्यंत पोहोचतात. ओकीबोकी निष्पर्ण झाडं नजरेला तितकीशी आल्हाददायक, सुखद वाटत नाहीत. तीन पानांच्या पळस झाडावरील, पिवळ्या फुलांचा बहर पाहता, वसंत ऋतूच्या आगमनाची बातमी चहूबाजूस पसरायला वेळ लागत नाही. कोकिल गुंजन, पक्षी स्थलांतरित होण्याचा सक्रिय काळ याच दिवसात घडतो. डोंगरमाथ्याशी, रानोमाळी पिवळी शिवार डोलू लागतात. पशू, पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी निसर्गाने रचलेली किमया म्हणजे चमत्कारचं रूप. रंगाच्या फुलांची बरसात निसर्गाने भरभरून दिल्याच्या खुणा सांगतात. ऋतू सजायला लागले की, मनातही मांडे खुलू लागतात. डोळ्याचं पारडं जड होतं. बहराच्या मोसमाला कुणाची दृष्ट न लागण्याचं भान निसर्ग राखतो. कुशीमातीतल्या एकेका तांबड्या कणावर अंकुराचं बीजारोपण करणाऱ्या इवल्याशा फुलांची मोजदाद होऊ शकत नाही. दार, परसदार, मळा, पाणवठा, रानमळा, बांदावर वैविध्यपूर्ण रंगातल्या, विविध आकारातल्या रानफुलं, पानफुलांची अनोखी दुनिया साऱ्यांना मोहात पाडते.

जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात मुंबईत बहुतांश ठिकाणी मनमोहक झाडं, फुलझाडाचं प्रदर्शन पाहण्याचा योग आला. छोट्या बोन्सायपासून ते अगदी वड-पिंपळापर्यंतच्या झाडांची मुबलकता, फुलझाडांची दुनिया. ज्यातील रंग फुलपाखराप्रमाणे दृष्टीलाही सुखावणारे. त्या दिवशी जिजामाता उद्यानातली एक संध्याकाळ, ही धकाधकीच्या जीवनातलं एक ओएसिस होतं. आठवडाभर चाललेल्या प्रदर्शनानं मुंबईच्या मुकुटावर मोरपीस चढलं; एवढी विविधता झाडं, पानं, फुलात प्रथमचं माझ्या पाहण्यात आली. देशोदेशीच्या जैवविविधतेचा आविष्कार पाहून, फुलझाडं प्रकारातल्या नावीन्यपूर्ण शोधांनी मुंबईकर अचंबित न होवोत तर नवल! वर्षातून एकदा होणारं प्रदर्शन आकर्षणाचा बिंदू ठरलं हे वेगळं सांगायला नको. यावेळी महानगरपालिकेच्या उद्यानात फुलझाडांवर घेतलेली मेहनत दिसून आली. वातावरणाशी जुळणारी फुलझाडं देखरेखीखाली असतात. विविध जाती प्रकारातले गुलाब, अष्टर, शेवंती असल्याने प्रथमच जास्वंदी फुलांचे प्रदर्शन मोठ्या प्रमाणावर दृष्टीस आले.

जास्वंद फुलाबद्दलची उत्सुकता वाढण्याचे कारण बहुधा हेच असावं. लहानपणापासूनच काही समजुती असतात ना, अगदी तसंच होतं माझं. गणपतीला आवडणारी लाल रंगांची फुलं ती जास्वंदी होय हेचं फिट बसलं होतं डोक्यात. आईकडून ऐकलेले काही औषधी उपयोग, गुणधर्म वगळता जास्वंद तेवढी माहीतही नव्हती मला. पण रंगाच्या विविधतेत पहिल्या नंबरवर असणारी लाल, पिवळी, शेंदरी, गुलाबी, तांबडी, भगवी फुलं प्रथमदर्शनी डोळ्यांत भरली. दोन, चार, सहा पाकळ्यांत जास्वंदीचा टवटवीतपणा दिसला. मलेशिया, दक्षिण कोरियाचं राष्ट्रीय फूल गणलेल्या जास्वंदी फुलाला इंग्रजीत हिबिस्कस नावाने ओळखतात हे माहीत असूनही जास्वंद म्हणजे आपल्याकडीलचं फूल हा गोड गैरसमज त्या दिवशी दूर झाला. बहुवार्षिक वनस्पतीत भरपूर फुलं देणारी जास्वंदी ही हरिवल्लभ, जयपुष्पी, रक्तपुष्पी, रुद्रपुष्पी, जपा(संस्कृत), अरुणा, जवाकुसुम, शू-फ्लॉवर नावाने ओळखली जाते. दाट झाडीतून डोकावणारे अतिशय मोहक पण सुगंधरहित फूल ज्याला कडक सूर्यप्रकाश लागतो. देवाला वाहण्यापासून, औषधी गुणधर्मयुक्त अशा जास्वंदीचा वापर खाण्याच्या पदार्थासाठी होतो हेही तितकचं महत्त्वाचं. केशवर्धक तेल ते सूप, चटणी, जेली इत्यादींसाठी ही जास्वंद उपयोगी ठरते. अभ्यासाने शिकता येतं या अन्वये मी जास्वंदी फुलाच्या अभ्यासात गुंतले. फुलांशी बोलता आलं, तर त्यांची ओळखही ओळखीची होते. ज्येष्ठ कवयित्री अंजना कर्णिक यांचं निसर्गप्रेम बऱ्याचदा मी अनुभवलं आहे. फुलांच्या, झाडांच्या सान्निध्यात रमताना त्यांच्याकडून सुंदर काव्य प्रस्तुत होते, बहरते. त्या म्हणतात, या फुलांवर येऊन बसती पक्षी

**या रंग रंगाची भूमिवरती नक्षी**
**ही फुलेच रंगपंचमीची साक्षी.**

किती निखालस सुंदरता या निसर्गात भरलीयं. फुलांच्या रंगारी दुनियेची, आसमंत सुगंधित करणाऱ्या जादुई किमयेची कीटकांना देखील भूल पडते. फुलांच्या साम्राज्याची भुरळ कोणाला नाही? रंगीत फुलं देवाला जशी प्रिय असतात तशीच ती आपल्याही पसंतीस उतरतात. मग सण म्हणू नका की उत्सव. 'फुलांची दुनिया न्यारी, मन घेतसे भरारी.' नैसर्गिक रंग, गंध फुलांवर अनोखा ताज कायम ठेवताना तिच्या बारीक-सारीक नजाकतीला बहरानंतर बळ येतं. मुबलक साठवून आहे निसर्ग आपल्या ओटीपोटात. तेव्हा केसात माळण्यासाठी, धार्मिक किंवा इतर शास्त्रीय संस्कारांसाठी लागणाऱ्या मोहक फुलांची दुनिया आपल्या आसपास सदैव असल्याने गरज आहे तिला फक्त न्याहाळण्याची. निसर्गाच्या सान्निध्यात रमणं, फिरणं या छंदासह निरीक्षण नावाची शक्ती माझ्या आसपास सतत वावरत असते. कोकण आणि गोव्याच्या भूमीत आढळणारी, कमी पाण्यात जगणारी जास्वंदी फुलं ही तिथल्या मातीला वरदान आहे. क्वचितच एखाद्या घरासमोर तुम्हाला गुलाब, चाफा दिसेल पण घोसाने वाढणारी जास्वंद रानात, घरादारांत, शेतात दिसतील. पावसाळ्याच्या दिवसांत मातीत पेरलेली तिची एक काठी पाळंमुळं रूजवत उगवून वर येते. गणपतीला वाहणारी जास्वंदी पाच किंवा त्यापेक्षा जास्त पाकळ्यांची असू शकते पण गोव्याच्या काही भागात एकावर एक तीन फुलं फुललेली जास्वंदी पाहून, मला आश्चर्याचा धक्का बसला. संपूर्ण झाड अशा पद्धतीने फुललेलं तेव्हा मोहही आवरेनासा झाला. एकाचं झाडावरच्या गुलाबी, पिवळ्या, तांबड्या, केशरी रंगछटा पाहून जास्वंदाप्रती स्नेह दाटून आला आणि मी लिहून गेले. फुलांनी फुलावे निर्मळी हसावे, अर्थ द्यावा जगण्याला. पाषाणाशी निजरूप व्हावे, देव भेटीला पावला. फुलांची चाहूल वसंताची सुरुवात. जास्वंद फुलली, पानगळीच्या मोसमात. जास्वंदीस बहर, तोही वर्षभर, देवाजीची कृपा असे सदैव आमच्यावर.

# अंध बालकांचा डोळस प्रवास



सोनू, हातातली पांढरी काठी टक टक वाजवत शाळेचा गणवेश घातलेली दहा-बारा वर्षांची बालिका माझ्या जवळ चालत येऊ लागली. तिच्या चेहऱ्यावर वेगळीच प्रसन्नता आणि निरागसता होती. मी उगाच खुर्चीतून उठायला गेले आणि ती म्हणाली, कशाला उठताय तुम्ही बसा ना. तिचा अगदी गोड आवाज कानावर पडला. गोड आवाज, गोड चेहरा, डोळे तेवढे भाव शून्य होते. डोळ्यांत काळोख असला तरी वागणं किती डोळस होतं तिचं. आज मुलींच्या अंध विद्यालयात आले होते. अगदी सहज मुलींना भेटायला. आपल्या आसपास छोट्या छोट्या मुली ज्यांना काहीही दिसत नाही, पांढऱ्या काठीच्या टक टक आवाजात त्या आपलं विश्व शोधतात. आपला प्रवास निश्चित करतात आणि आपलं ध्येय पण गाठतात. किती डोळस आहे हा काळोख.

जागतिक आरोग्य संघटनेने (थक्ज) दृष्टिदोषाची व्याख्या अंशतः दृष्टीपासून अंधत्वापर्यंतची स्थिती म्हणून केली आहे. आपल्याला अंध व्यक्तींची दोन प्रकारात वर्गवारी करून घेऊन समजून घेता येईल.

१. पूर्णतः अंध व्यक्ती - हे अंधार व प्रकाश यातला फरक ओळखू शकत नाही. यांना एका प्रकाश असणाऱ्या खोलीत बसवले आणि तेथील दिवा बंद केला तरी त्यांना अंधाराची थोडीसुद्धा जाणीव होत नाही.

२. अंशतः अंध व्यक्ती - डोळ्याला एखादी इजा झाल्यामुळे किंवा एखाद्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे काही प्रमाणात अंध झालेल्या व्यक्ती असतात. यांना दिसण्याची टक्केवारी प्रत्येक व्यक्तीनुसार कमीजास्त असू शकते.

आकडेवारी सांगते की संपूर्ण जगात असलेल्या ३.७ कोटी अंधांपैकी १.५ कोटी अंध एकट्या भारतातच आहेत आणि योग्य उपचार मिळाले असते तर त्यापैकी ७५ टक्के रुग्ण अंध होण्यापासून टाळता आले असते. भारताला दरवर्षी २.५ लाख नेत्रदान केलेल्या डोळ्यांची आवश्यकता भासते. पण भारतात असलेल्या १०९ नेत्रपेढींमधून दरवर्षी फक्त २५ हजारच नेत्र जमा केले जातात आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांपैकी ३० टक्के नेत्र हे विविध कारणांमुळे वापरता येत नाहीत.


अनेक अंध बालक बालिका, कोणीतरी व्यक्ती आपले नेत्रदान करतील आणि आपण हे जग बघू शकू या प्रतीक्षेत ओळीत थांबली आहेत. पण त्यांना देखील याची निश्चितच जाणीव असते की, नेत्र मिळणं इतकं सहज शक्य नाहीय. आणि मग सुरू होतो त्यांचा डोळस प्रवास. ब्रेल लिपीच्या माध्यमातून शिक्षण सुरू होतं. निसर्ग एखादी शक्ती हिरावून घेते तेव्हा एखादी शक्ती देऊन पण जाते, असा समज आहे. कितीतरी अंध बालक बालिका सुरेल गळ्याचे धनी असतात. संगीत विषयात त्यांना खूप आवड असते. भाषा ज्ञान, स्पर्श ओळख, वास ओळखण्याची शक्ती यात ते पारंगत असतात. स्पर्शाने, एखाद्या विशिष्ट वासाने अंध व्यक्ती कोणालाही ओळखू शकतात. समाज एकतर दयेचा दृष्टिकोन ठेवतो किंवा अंध म्हणून त्यांचे शोषण करण्याची वृत्ती दिसून येते.

अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला, रेल्वेत, सार्वजनिक स्थळी अंध व्यक्तीचा गट गाणी गाताना दिसून येतो. त्यांच्याकडे उपलब्ध वाद्ये पण ते उत्तम प्रकारे वाजवताना दिसून येतात. पण आजच्या परिस्थितीत अंध बालक, बालिका शिक्षण घेऊ लागले आहे. म्हणून भविष्यात त्यांचे पुनर्वसन कसं होईल याची ठोस आखणी करण्याची गरज आहे. शाळा, कॉलेज आणि सार्वजनिक वाचनालयांमध्ये ब्रेललिपीतील पुस्तके पुरेशा प्रमाणात उपलब्ध असायला हवी आहे. शाळा- कॉलेजातील अभ्यासक्रम बनवताना अंधही सहजरीत्या शिकू शकतील याकडे गंभीरतेने लक्ष केंद्रित करणं आवश्यक आहे. शिकवताना पुरेसे प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध होतात का? आणि त्यामुळे अंधांचे मूलभूत अधिकार त्यांना प्राप्त होण्यास अडचण निर्माण होत आहे का.

याचा पण विचार व्हायला हवा. अंधांमधील असणाऱ्या शारीरिक कमतरतेमुळे बेरोजगारीचे प्रमाणही त्यांच्यात जास्त आहे, असे दिसून येते.शिक्षण घेण्यास त्यांना प्रवृत्त करायला हवं. यासाठी अंध बालकांसाठी निवासी शाळांची संख्या वाढताना दिसत आहे. त्यांच्या वाट्याला आलेला हा अंधकार आणि या अंधकारात चाचपडत आपला प्रकाश दिवा शोधणारी ही बालके आपल्याला मायेचा विश्वासाचा स्पर्श मागत आहेत. आपण हात पुढे करू या आणि फक्त त्यांचे मनोबल आणि आत्मविश्वास कमी होणार नाही याची काळजी घेऊ या. ते सक्षम आहेतच आपलं ध्येय गाठण्यात आपण फक्त त्यांच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी खारीचा वाटा घेऊ या. आपल्या दररोजच्या आयुष्यात थोडी सवय करू यांच्याशी कनेक्ट होण्याची. प्रवासात भेटले तर चार दोन रुपये भिक्षा देऊन निघून जाण्यापेक्षा बालक बालिकाना अंध शाळेत पाठवण्यात यावं याची माहिती त्यांच्या पालकांना देता येईल का? तिथे ते सुरक्षित राहून शिक्षण घेतील आणि सन्मानाने जीवन जगू शकतील. रेल्वेतला त्यांच्या सोबतचा आपला प्रवास संपेपर्यंत ही माहिती निश्चितच आपण त्यांना देऊ शकतो.

सध्या अंधांकरिता आशावादी चित्र दिसते आहे. असे सकारात्मक प्रयत्न शासनाकडून होत असताना दिसत आहेत. अंधांकरिता सरकारी नोकऱ्यांमध्ये, सार्वजनिक प्रवासांच्या वाहनांमध्ये आरक्षण ठेवले जाते. प्रवासभांड्यामध्ये त्यांना सवलत दिली जाते. आज काही अंध ीािल, ीािल पास होऊन सरकारी अधिकारीही झालेले दिसताहेत. बँकाच्या परीक्षा देऊन बँकेत त्यांची अधिकारी पदावर नेमणूक होत आहे. अंधशाळांची संख्याही वाढते आहे. फक्त अंधांसाठी असलेल्या काही निवासी सेवाभावी संस्थांमध्ये त्यांच्या राहण्या-खाण्यासहित शिशुवर्ग ते आठवीपर्यंत शिक्षणाची मोफत सोय होत आहे. तेथे त्यांना गायन, वादन, मल्लखांब, शारीरिक कसरत करण्याकरिता प्रोत्साहित केले जाते. तेथे फक्त अंधांकरिता खेळांच्या स्पर्धांही घेण्यात येतात. त्यांना काही स्वयंरोजगाराचे प्रशिक्षणसुद्धा देण्यात येते. अंधांचे जीवन सुखकर होण्याकरिता आज माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या खुबीने वापर केला जातोय. कॉम्प्युटरच्या वेगवेगळ्या ॲप्लिकेशनच्या मदतीने अंधव्यक्ती आता लिहू, वाचू आणि शिकूही शकत आहेत. कॉम्प्युटर प्रोग्रामर बनून नोकऱ्याही पटकावताहेत. टायपिंग करून विंडोजचे वर्ड आणि एक्सेल वापरतायत. खास ब्रेल लिपीचे प्रिंटर वापरून पुस्तकेही लिहीत आहेत.लेखक कवी म्हणून नावरूपाला येत आहेत. रीनाताई पाटील यांनीच मला या शाळेची माहिती दिली होती. त्यापण याच अंध शाळेच्या विद्यार्थिनी आहेत. त्यांच्या यशस्वी प्रवासाची कथा सांगणारा एक लेख मी लिहिला होता. त्या आज बँकेत अधिकारी आहेत आणि माझ्या मैत्रीण पण आहेत. त्यांच्या अनेक उपक्रमात मी सहभागी असते. आम्ही सगळे बाईपण भारी देवा हा सिनेमा बघायला गेलेलो. तेव्हा अगदी जवळून अनुभवलं होतं काहीही दिसत नसताना इतका आनंद त्या सगळ्या अंध महिला घेत होत्या.त्यांचा तो आत्मविश्वास भारी होता. स्वतः रोहिणी हतंगडी ताईंनी सगळ्यांना फोनवर शुभेच्छा दिल्या, तेव्हा त्यांचा उत्साह गगनात मावेनासा झाला होता. आपले दोन शब्द, थोडीशी साथ हा अंधार प्रकाशमय करू शकते.सोनू माझ्या जवळ येऊन बसली आणि तिने माझा हात हातात घेतला. माझा स्पर्श साठवून घेत असावी कदाचित. मग म्हणाली, तुम्ही सोनचाफा लावला आहे ना केसात. मी हो म्हणाले तेव्हा तिच्या चेहऱ्यावर पण एक सोनचाफा फुलला होता. आपला रंग सुगंध घेऊन आता सोनू पण सज्ज होती बहरण्यासाठी.

# टेनिस कोर्टचा नवा सितारा



क्लेकोर्टवरील सर्वात दीर्घ लांबीचा सामना पाच सेटमध्ये जिंकून स्पेनच्या कार्लोस अल्काराझने विजेतपदावर आपले नाव कोरले आणि क्ले कोर्टचा नवा बादशहा अवतरला आहे याची साक्ष दिली. रॉजर फेडरर, राफेल नदाल आणि नोवास जोकोविच यांच्यानंतर कार्लोस अल्काराझने आपल्या आगमनाची ग्वाही दिली आणि त्याने अंतिम त्याचा स्पर्धक जॅनिक सिनर यांनी टेनिसला नव्या उंचीपर्यंत नेले. क्ले कोर्टवरील सर्वात लांबलचक अंतिम सामना होता आणि जॅनिक सिनरला पाच चमकदार सेट्समध्ये त्याला पराभूत करावे लागले आणि हे करण्यासाठी त्याची दमछाक झाली हे नाकबूल करता येणार नाही, त्याच्या प्रदर्शनाने चाहते आणि तज्ज्ञ दोघांनाही आश्चर्यचकित केले ही मात्र शंभर नंबरी खरी गोष्ट आहे.

अल्काराझचे वैशिष्ट्य हे होते की, त्याने दोन सेटमध्ये पिछाडी भरून काढून सिनरवर सरळ सेट्सनमध्ये मात केली. कार्लोस अल्काराझ हा त्याच्या अष्टपैलू टेनिस खेळासाठी, त्याचा कोर्टवरील अपवादात्मक उत्कृष्ट परफॉर्मन्स आणि अत्यंत जोरदार कामाच्या प्रतिनिष्ठा असलेला टेनिसपटू म्हणून ओळखला जातो ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. तो सर्व प्रकारच्या टेनिस मैदानावर खेळण्यासाठी प्रसिद्ध आहे आणि त्यात क्ले, हार्ड कोर्ट आणि ग्रास यांवरही उत्कृष्ट खेळतो. नदाल आणि फेडरर यांच्यानंतर कोण या प्रश्नाचे उत्तर आता मिळाले आहे हे निश्चित.

कारण अल्काराझ नदाल किंवा फेडरर यांच्याप्रमाणेच कुटुंबात रमणारा आहे. जोरदार सर्व्हिस आणि उत्कृष्ट बॅकहँडचे फटके हे त्याचे खेळाचे ठळक वैशिष्ट्य म्हणावे लागतील. आपल्याकडे फक्त क्रिकेटशिवाय अन्य कोणत्या खेळाकडे पाहायचे नाही असे धोरण राज्यकर्त्यांपासून आपल्या सर्वांचे असल्याने इतर खेळांना आपण सायडिंगला टाकतो. त्या खेळातील गुणांचा उपयोग केवळ ग्रेस मार्क म्हणून करतो. इतर देशांत तसे नाही, त्यामुळे त्यांच्याकडे अगदी रॉड लेवरपासून बिजॉन बोर्ग आणि ख्रिस एव्हर्ट लॉईडपासून जॉन मॅकेन्रोपर्यंत श्रेष्ठ टेनिसपटू होऊन गेले.

आपल्याकडे विजय अमृतराज हे शेवटचे नाव घेण्यासारखा टेनिसपटू. पण आपल्याकडे क्रिकेटचे अगणित स्टार्स होऊन गेले. पण आपल्याकडे क्रिकेटने टेनिससह इतर साऱ्या खेळांना खाल्ले आणि क्रिकेटची लोकप्रियता प्राप्त होऊ शकली नाही हे वास्तव आहे. दुसरीकडे अन्यही बाबी आहेत त्या म्हणजे टेनिसच्या रॅकेट्स प्रचंड किमती आहेत आणि सामान्य जाऊ द्या पण श्रीमंत लोकांनाही त्या परवडत नाहीत. त्यामुळे टेनिस हे आपल्याकडे श्रीमंतांचे खेळ समजले जातात. कार्लोस अल्काराझ हा तीन वेगवेगळ्या पृष्ठभागांवर ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकणारा सर्वात लहान वयातील खेळाडू आहे.

त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अल्काराझचा फोर हँड खूप शक्तिशाली आहे. त्यामुळे अगदी शेवटच्या क्षणी मनगटाची दिशा बदलू शकतो. अल्काराझ हा आता नदाल आणि फेडरर यांची जागा घेत आहे. अल्काराझ याने वयाच्या अवघ्या चौथ्या वर्षी रॅकेट हातात धरली आणि त्याने आज ही उंची गाठली आहे. पण हा त्याचा प्रवास इथेच थांबणार नाही. त्याला अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. त्या दृष्टीने ही एक केवळ मोठी उपलब्धी आहे इतकेच म्हणता येईल.

अल्काराझचे वडीलही टेनिस अकादमी चालवतात आणि त्याचाच तो पहिला विद्यार्थी आहे. त्याचे संपूर्ण कुटुंबच टेनिसला वाहून घेतलेले आहे. कारण त्याचे वडील टेनिस कोच आहेत, तर आजोबा हे क्लब मेंबर होते. त्यामुळे त्याला टेनिसचे धडे घरूनच मिळाले हे सत्य आहेच. त्यामुळे घरीच त्याची जडणघडण झाली. अल्काराझकडे लहानपणापासून स्पष्ट दृष्टिकोन होता की, त्याला उच्च दर्जाचे टेनिस खेळायचे आहे आणि त्याने ते साध्य केले. जसे की आपल्याकडे सुनील गावसकर किंवा आताचा वैभव सूर्यवंशी यांच्याकडे लहानपणापासूनच तसा दृष्टिकोन आहे तसेच.

अर्थात या सर्वांना आयत्या ताटात सारे काही वाढून मिळालेले नाही. त्याना त्यांचा संघर्ष करावाच लागला आहे. सुनील गावसकर तर कापडाचे चेंडू करून बिल्डिंगच्या गॅलरीत प्रॅक्टिस करायचा असे त्याच्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. अर्थातच भारतीयांची आणि पाश्चात्यांच्या जीवनशैलीत प्रचंड फरक असल्याने गरीब-श्रीमंतीतील अंतर आणि इतर बाबतीतील फरक जाणवतोच. पण ज्याला खेळाप्रती पॅशन म्हणतात ते तर सारखेच असते.

अल्काराझ हा क्ले कोर्टवरील नवा उगवता तारा असला आणि त्याने मोठ्या बक्षिसाची स्पर्धा जिंकली असली तरीही त्याने आपल्या डोक्यात हवा जाऊ दिली नाही हे विशेष. जसे आपल्याकडे गावसकर यांच्यापासून प्रेरणा घेऊन अनेक क्रिकेटपटू घडले तसेच अल्काराझ याच्यापासून प्रेरणा घेऊन स्पेनमधील लहान मुले दुसरा अल्काराझ होण्याची स्वप्ने उराशी बाळगून लढत आहेत.

ही कोणत्याही स्पोर्टसची कौतुकास्पद बाब असते. त्याने तीन वेगवेगळ्या प्रकारच्या पृष्ठभागांवर टेनिस स्पर्धा जिंकली आहे हे त्याचे वैशिष्ट्य. टेनिसपटू हे जनमानसात लवकर आपला ठसा उमटवतात. सचिन तेंडुलकर त्याच्या बालपणात क्रिकेट खेळत असे तरी बिजॉन बोर्गचा फॅन होता आणि त्याचे सुरुवातीची छायाचित्रे तशाच हेअर स्टाइलची आहेत. अल्काराझ हा आज तरुणांचा ताईत बनला आहे आणि स्पॅनिश बालकाचा हिरो आहे अर्थात त्याच्या काही त्रुटीही आहेत.

त्यातील एक म्हणजे ग्रासकोर्टवरील त्याला बादशहा असा किताब मिळवायला अनेक सामने खेळावे लागतील, पण क्ले कोर्टचा तो बादशहा आहे आणि आज त्याला टेनिस विश्व मानते यातच सारी त्याची रोमांचकता आहे. त्याने अनेक आठवडे जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे आणि आता तर त्याने फ्रेंच ओपन स्पर्धा जिंकून आपली बादशाही सिद्ध केली आहे. आजच्या काळातील सर्वोत्तम टेनिसपटूंपैकी तो निःसंशय एक आहे यात शंका नाही, क्ले कोर्टच्या बादशहाला मानाचा मुजरा.

# जनसुरक्षा विधेयक आंदोलनाचा अधिकार काढून घेत नाही

# केवळ नक्षल, माओवादाशी संबंधित संघटना वर कारवाई होईल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था)-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा बहुचर्चित महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकाद्वारे केवळ नक्षलवादी व माओवादी चळवळीशी संघटनांवर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट केले. प्रस्तुत विधेयक कोणत्याही लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात नाही. ते कुणाचा आंदोलनाचा अधिकारही काढून घेत नाही. हे विधेयक केवळ नक्षलवादी व माओवादी चळवळीशी संबंधित फ्रंटल संघटनांवर बंदी घालण्यासाठी आणण्यात आले आहे, असे ते म्हणाले.महाराष्ट्र विधानसभेने गुरूवारी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. हे विधेयक आवाजी मतदानाने पारित करण्यात आले. आज विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक मंजूर झाल्यावर समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, मला अतिशय आनंद आहे की, जनसुरक्षा विधेयक काल विधानसभेने मंजूर केले. कालच्या चर्चेत या विधेयकासंदर्भात ज्या काही शंका होत्या, त्या सर्व शंकांचे उत्तर मी दिले आहे. हे विधेयक पारित करताना आम्ही अतिशय लोकशाही पद्धत आम्ही स्वीकारली. २६ लोकांची संयुक्त निवड समिती होती. त्यात विरोधी पक्षांचे सर्वच प्रमुख नेते होते. या समितीने लागोपाठ बैठका घेतल्या. या प्रकरणी ज्या काही सुधारणा आल्या होत्या, त्या समाविष्ट करण्यात आल्या.**

यासंदर्भात विशेषतः काँग्रेस प्रणित यूपीएच्या सरकारने राज्यसभेत दिलेली माहिती मी वाचून दाखवली. यूपीएच्याच सरकारने यासंदर्भात सुप्रीम कोर्टात सादर केलेले प्रतिज्ञापत्रही मी वाचून दाखवले. त्यामुळे कुठल्याही राजकीय भावनेने प्रेरित न होता या महाराष्ट्राला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान दिले आहे. त्या संविधानानेच हे राज्य चालेल. हे संविधान उलथावण्याचा प्रयत्न करणाऱ्या संघटनांवर कारवाई करण्यासाठी हे विधेयक तयार करण्यात आले आहे. मला आनंद आहे की कोणत्याही सदस्याने या विधेयकाला थेटपणे विरोध केला नाही, असे फडणवीस म्हणाले.

सद्यस्थितीत महाराष्ट्रात दुसऱ्या राज्यांत बंदी असलेल्या, पण येथे कार्यरत असणाऱ्या ६ संघटना आहेत. याशिवाय अशा पद्धतीच्या एकूण ६४ संघटना महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी कॅन्टीन कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीविषयी शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा नोंद न झाल्यावरही आपले मत व्यक्त केले. निश्चितपणे पोलिसांनी चौकशी केली पाहिजे. या प्रकरणी एखादी तक्रार दाखल होण्याची गरज नाही. या प्रकरणी दखलपात्र गुन्हा असेल तर त्यासंदर्भात पोलिस योग्य ती कारवाई करतील. शेवटी फोर्स किती यूज केला या आधारावर कारवाई होते. पोलिसांना कारवाई करू द्या ते योग्य ती कारवाई करतील, असे ते म्हणाले.१२ हजार वेगवेगळ्या लोकांनी या विधेयकावर काही सूचना शिफारशी केल्या होत्या. त्या समाविष्ट करण्यात आल्या. त्यानंतर संयुक्त निवड समितीने आपला अहवाल सादर केला. त्यावर आधारित विधेयक काल आपण सभागृहात मांडले होते. या बिलाच्या चर्चेत मी स्पष्टपणे दाखवून दिले की, हे विधेयक कुठल्याही लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात नाहीत. कुणाचाही आंदोलनाचा अधिकार काढून घेत नाही. कोणत्याही लोकशाही मानणाऱ्या संस्थेवर किंवा संघटनेवर कुठलाही घाला घालणारे हे विधेयक नाही. हे विधेयक नक्षलवादी व माओवादी चळवळीशी संबंधित ज्या फ्रंटल संघटना आहेत, त्या संघटनांवर बंदी घालण्यासाठी हे विधेयक आणण्यात आले आहे.फडणवीस पुढे म्हणाले, मी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, ४ राज्यांनी यापूर्वीच अशा प्रकारचे विधेयक यापूर्वीच मंजूर केले आहे. केंद्राने सर्वच नक्षलग्रस्त राज्यांना अशा प्रकारचे विधेयक मंजूर करण्याचे निर्देश दिलेत. मी हे ही सांगितले की, आपल्याकडे कायदा नसल्यामुळे दुसऱ्या राज्यात बंदी असलेल्या संघटना राजरोसपणे आपल्या महाराष्ट्रात आपल्या कारवाया करतात. कारण, आपल्याकडे त्यांच्यावर कारवाई करण्याचा कोणताही अधिकार नाही. मी हे देखील लक्षात आणून दिले की, कशा प्रकारे माओवादी संघटनांनी आपले ऑपरेशन अर्बनमध्ये केले आहे. फ्रंटल संघटना तिथे काम करत आहेत.



## आपल्या गुरु बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा-वे.शा.सं.अनंत जोशी

**माजलगाव (प्रतिनिधी):** भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालयात गुरुपौर्णिमेच्या निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह ड.विश्वासराव जोशी,प्रमुख वक्ते वेदशास्त्रसंपन्न अनंतदेवा जोशी, शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,शालेय समिती अध्यक्ष पवन मानधने,सदस्य श्री लिंगराज घुसे, उपक्रमशील मुख्याध्यापक सुरेश अन्नदाते सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सरस्वती देवी व महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रतन गिरी सर यांनी केले.या कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्याच्या वेशभूषेत येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते वेदशास्त्रसंपन्न अनंतदेवा जोशी यांनी आपल्या मार्गदर्शनात गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले,ते म्हणाले की,आषाढ शुद्ध



पौर्णिमेला म्हणजेच गुरुपौर्णिमेला 'व्यास पौर्णिमा' देखील म्हणतात.व्यासांनी महाभारत,पुराणे लिहिली. त्यांना वंदन करण्याचा,त्यांची पुजा करण्याचा हा मंगल दिन असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांच्या एवढे श्रेष्ठ गुरु,आचार्य अद्याप झालेले नाहीत,अशी आपली श्रद्धा आहे तसेच आपल्या गुरु बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष ड.विश्वासराव जोशी म्हणले की,आजचा हा गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम हृदय स्पर्शी आणि भाव स्पर्शी आहे.शिष्यामधले गुण ओळखायचे आणि त्यांना वाव द्यायचा हे गुरुचे काम आहे.गुरु हे खऱ्या अर्थाने रत्न पारखी आहेत असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अनुराधाताई लाहोरकर यांनी केले तर आभार रंगनाथ तौर सर यांनी मानले.कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने झाली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक बंधू भगिनींनी परिश्रम घेतले.कार्यक्रम मुख्याध्यापक सुरेश अन्नदाते सर यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाला.

## लिंगायत समाज स्मशानभुमीची उपजिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अंबाजोगाई (प्रतितिधी )**-येथील लिंगायत समाज स्मशानभुमिची मागणी करणारे निवेदन उपजिल्हाधि काऱ्यांना देण्यात आले. सोमवारी लिंगायत समाजातील विविध उपजाती - जमाती मधील नागरिकांनी एकत्रित येऊन लिंगायत स्मशानभुमिसाठी पाच एकर जागा देण्याची मागणी केली . येथील लिंगायत समाजाची स्मशानभुमि शहराच्या उत्तरेला बाराखांबी ( सकलेश्वर मंदिर ) जवळ आहे . परंपरागत रितीने येथे समाजातील मृत पार्थिवाचा दफनविधी करण्यात येतो . यापूर्वी शासनाने याच भागात दोन एकर जागा स्मशानभुमिसाठी उपलब्ध करून दिली . त्याच ठिकाणी दफनविधी करण्यात येतात . परंतु शासनाच्या पुरातत्व विभागाने सकलेश्वर मंदिर परिसरात उत्खनन केले . तेथील परिसर राखीव क्षेत्र जाहीर



केले असल्यामुळे लिंगायत समाजाला अंत्यविधी साठी जागा अपुरी पडू लागली . तेथे अंत्यविधी साठी विरोध करण्यात येतो .त्यामुळे स्मशानभुमिचा प्रश्न ऐरणीवर आला . लिंगायत समाजाच्या वतीने अनेकवेळा शासन दरबारी निवेदने परंतु अद्यापही उपयोग झाला नाही . शहरातील लिंगायत समाजाच्या वाढत्या लोकसंख्येनुसार स्मशानभुमिची जागा देण्याची मागणी वारंवार करण्यात आली . लिंगायत बांधवांनी एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार केला आहे . या प्रसंगी एस . आर . बुरांडे , डॉ निशिकांत पाचेगावकर , श्रीकांत ढेले, माणिक बुरांडे , बाळासाहेब राऊत, ओम खंदारे, डॉ संतोष कडगे , शैलेश स्वामी , गणेश टुरके , दिलीप बुरांडे, दिलीप दामा, बाबासाहेब बुरांडे, ड .अनिल व्यवहारे , गणेश टुरके , अशोक खंदारे, बसलिंगअप्पा हरंगुळे, विश्वनाथ बुरांडे, संजय बुरांडे, वाघमारे, राऊत , उमा अण्णा शेटे, शुभन वारद
शिवकुमार निर्मळे व इतर नागरिक उपस्थित होते .

## शिखर संस्थानावर गुरु पौर्णिमा भक्तीभावात साजरी

**माहूर (प्रतिनिधी):** -गुरु पौर्णिमेनिमित्त रविवार दि.१० जुलै रोजी हजारों भाविकांनी श्री दत्तशिखर व श्री देवदेवेश्वर मंदिरात जाऊन श्रीदत्तप्रभुचे दर्शन व प.पु.प.म.मधूसूदनजी भारती महाराज आणि मधुकरबाबा शास्त्री कवीश्वर यांचे पूजन करून त्यांचे आशीर्वाद घेतले.गुरुपौर्णिमे निमित्त दत्त शिखर संस्थानचे प.पु.प. म.मधूसूदनजी भारती महाराज यांचे हस्ते स.६ वा.व्यासपूजा पार पडली. त्यानंतर श्रीदत्त प्रभूला अभिषेक व आरती करण्यात आली.यावेळी पूजनीय महंतांनी दत्तशिखर मंदिराभोवती असलेल्या महंतांच्या समाध्यांचे दर्शन घेतले.पुढे मंदिराच्या सभागृहातील परंपरागत गादीवर विराजमान होऊन शिष्य मंडळी व भाविक भक्तांना त्यांनी आशीर्वाद दिला. गुरु पौर्णिमेनिमित्त शुक्रवारी राज्यातील विविध भागातून तसेच शेजारच्या तेलंगणा राज्यातून आलेल्या आनंदमार्गी भक्तांसह दत्तभक्तांनी मंदिरात प्रचंड गर्दी केली होती.यावेळी दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा व प.पु.प.म.मधूसूदनजी भारती महाराज की जय या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून गेला होता.या धार्मिक विधीचे पौरोहित्य,विलास जोशी, योगेश जोशी ,रवी जोशी, ऋषिकेश जोशी यांनी केले.यावेळी दत्तशिखरचे मुख्य पुजारी वासुदेव भारती, दिलीप भारती महाराज, चिंतामण भारती महाराज, धनराज भारती महाराज व असंख्य साधुसंत यावेळी उपस्थित होते.महानुभाव पंथीयांचे महास्थान असलेल्या देवदेवेश्वर मंदिराचे महंत प.पु.प.म.मधुकरबाबा शास्त्री कवीश्वर यांनी स. ७ वा.मंदिरात विडा अवसर केला.त्यानंतर मूर्तींना (विशेष ) मंगलस्नान घालून चंदनाचा लेप (उटी )चढ़विण्यात आला.पंथीय संत,महंत,भिक्षुक व वासनीकांसाठी मंदिराच्या भव्य प्रांगणात दु. १ते ५ वाजेपर्यंत प्रसाद (भगवान श्री चक्रधर स्वामी यांचा स्पर्श झालेल्या वस्तु ) वंदनाचा कार्यक्रम पार पडला.यावेळी भगवत गीतेच्या १५ व्या अध्यायाचे समूह स्वरात पठण करण्यात आले.याप्रसंगी पावसाची सारखी रिमझिम सुरु होती. आनंद दत्त धाम आश्रम येथे गुरुवर्य साईनाथ महाराज वसमतकर यांच्या दर्शनासाठी भक्तांची रिघ पाहायला मिळाली तर आनंदधाम आश्रम मध्ये दर्शनासह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलं होते.

## श्रीरामपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामास गती द्यावी-पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे निर्देश

**शिर्डी । प्रतिनिधी**

श्रीरामपूर शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या १७८ कोटी रुपयांच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची कामे निर्धारीत वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.श्रीरामपूर शहरातील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण श्री.विखे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत पाणी पुरवठा योजनेची पाहणी करून कामांची माहिती घेतली.

२०५१ सालापर्यंत वाढ होणाऱ्या लोकसंख्येचा अंदाज लक्षात घेऊन २६.३६ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सद्यस्थितीत जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर बेडचे खोदकाम पूर्ण झाले असून दगडी सोलिंग व क्रॉकींगचे काम प्रगतीपथावर आहे. वितरणासाठी ५९ कि.मी. पाइपलाइनपैकी १७ कि.मी.



पाइपलाइन टाकण्यात आली आहे.

तलावाचे सर्वेक्षण व बोअर कोअर चाचण्या पूर्ण करण्यात आल्या असून खोलीकरणाचे काम लवकरच सुरू होणार आहे. तलावातील आरसीसी कामानंतर तळाचा थर प्लास्टिक शीट व वाळूने तयार करण्यात येणार असून त्यासाठी सुमारे दोन महिने लागतील.शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन ही योजना महत्त्वाची असून कामे वेळेत व दर्जेदारपणे पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री विखे-पाटील यांनी दिले. तसेच नागरी सुविधांसंदर्भात सामाजिक भावना लक्षात घेऊन जबाबदारीने काम करण्याचे आवाहन त्यांनी अधिकाऱ्यांना केले.यावेळी प्रांताधिकारी किरण सावंत-पाटील, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, तसेच अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# ॲड.उज्वल निकम यांची खासदारपदी निवड



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

ज्येष्ठ सरकारी वकील उज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून निवड करण्यात आली आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करत निवडणूक लढवली होती. मात्र, काँग्रेस उमेदवार वर्षा गायकवाड यांच्याकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. आता राज्यसभेत राष्ट्रपती कोट्यातून त्यांची खासदारपदी निवड झाली आहे.१९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट खटल्यासह अनेक महत्त्वाच्या केसेस मध्ये सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांनी काम पाहिले होते. गुलशन कुमार हत्याकांड, प्रमोद महाजन हत्या, २००८ मध्ये मुंबईवर झालेला हल्ला, कोपर्डी बलात्कार या हायप्रोफाईल केसमध्ये त्यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात देखील सरकारी विशेष सरकरी वकील म्हणून ते काम पाहत आहेत.

**चार जणांची खासदारपदी निवड**

उज्वल निकम यांच्यासोबत हर्षवर्धन श्रृंगला, डॉ. मीनाक्षी जैन, सी. सदानंदन मास्टर यांची देखील राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हर्षवर्धन श्रृंगला हे माजी परराष्ट्र सचिव आहेत. तर, सदानंद मास्टर हे केरळमधील ज्येष्ठ समाजसेवक शिक्षण तज्ज्ञ आहेत. तर, मीनाझी जैन हा प्रसिद्ध इतिहासकार आहेत.

# परळीत गुरु महिमेचा गजर! दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या गुरूपोर्णिमा उत्सवाला भाविकांची मोठी गर्दी

## गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते-सुश्री पद्महस्ता भारतीजी

## सदगुरूच योग्य मार्ग दाखवून कल्याणाचा महामंत्र देतो-सुश्री अन्नपूर्णा भारतीजी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

दिव्य ज्योति जागृती संस्थान लातूर शाखेच्या वतीने प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने हालगे गार्डन परळी वैजनाथ येथे गुरूपोर्णिमा महोत्सव अत्यंत भव्य, दिव्य व भक्तिमय वातावरणात मोठया उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला हजारो भाविकांनी उपस्थित राहुन गुरूचरित्राचा महिमा अनुभवला. कार्यक्रमाची सुरूवात परळी शहरातील मान्यवरांच्या हस्ते पवित्र दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर श्री गुरूंची आरती, भजने व भक्तीमय वातावरणात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला. यानंतर प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या दिल्ली येथील सुप्रसिद्ध भागवत भास्कर कथा व्यास सुश्री पद्महस्ता भारतीजी यांनी आपल्या सुमधूर वाणीतील प्रवचनातून गुरूंचे जीवनातील स्थान, त्यांची शास्त्रोक्त महती, अध्यात्मिक मार्गदर्शनाचे महत्व यावर सखोल विचार मांडले. त्यांनी वेद-उपनिषदे तसेच विविध संतांच्या उदाहरणांच्या माध्यमातून गुरू हा एकमेव असा दीपस्तंभ आहे, ज्यो अज्ञानातून ज्ञानाकडे वाट दाखवतो, असे ठामपणे सांगितले. यावेळी अनेक भाविकांना त्यांच्या प्रवचनातून नवचैतन्य व सकारात्मक प्रेरणा मिळाल्याचे जाणवले.

परळी येथील हालगे गार्डन येथे आज रविवार दि.१३ जुलै रोजी दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या वतीने आयोजित गुरू पोर्णिमा उत्सव २०२५ प्रसंगी प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री पद्महस्ता भारतीजी बोलत होत्या. कार्यक्रमस्थळ भक्तांनी आकर्षकरित्या सजविल्याने आनंदी व भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. परिसरात रांगोळी काढून आणि सुशोभिकरण केल्याने वातावरण प्रसन्न दिसत होते. प्रवेशद्वारालाच प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांचे आकर्षक स्वरूप एका सुंदर मंदिरात दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या मंदिरापुढेही आकर्षकरित्या काढलेली रांगोळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. सत्संग परिसरात विविध साहित्याचे स्टॉल लावले होते.



आपल्या सत्संग कार्यक्रमातून सुश्री पद्महस्ता भारतीजीनी गुरू कोण असावा ? यापासून शिष्यापर्यंतची संपूर्ण व्याख्या अतिशय सहजतेने व विविध उदाहरणासह स्पष्ट केले. ते म्हणाले की, गुरू सेवा ही सर्वश्रेष्ठ असून ही सेवा श्री हनुमंतासारखी पारदर्शक असावी. श्रीराम व हनुमान यांचे संदर्भ उदाहरण देवून सुश्री पद्महस्ता भारतीजी पुढे म्हणाल्या की, गुरू हा बुद्धीचा राजा असून गुरू व शिष्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. जीवन जगत असतांना आपणास अनेक अडचणी येत असतात. परंतू या अडचणीतूनही सदाचाराचा मार्ग दाखविण्याचे काम आपले गुरू नकळतपणे करीत असतात त्याकरीता गुरूवर विश्वास असणे अत्यंत आवश्यक असून अनेकदा गुरू शिष्याची परिक्षा घेतो तेंव्हा शिष्याने त्या प्रसंगाला तन्मयतेने तोंड दिले पाहिजे असे सुश्री पद्महस्ता भारतीजी म्हणाल्या. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, भारत हा गुरू परंपरेवर विश्वास ठेवणारा, त्यांना मानणारा असून गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते. अर्थातच श्रद्धा, विश्वास, विनम्रता व शालीनता शिष्यात असणे आवश्यक असून अशा सदाचारी व्यक्तीला गुरूवर्य योग्य मार्ग दाखवून त्याचे कल्याण करतात असे विचार प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री पद्महस्ता भारतीजी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात बोलतांना पण.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री अन्नपूर्णा भारतीजी यांनी सांगितले की, सध्याचे जीवन अत्यंत खडतर असून स्पर्धेच्या युगात मानव नाहकपणे भरकटत आहे. अशावेळी गुरू त्यांना योग्य मार्ग दाखवून कल्याणाचा महामंत्र देतो असे त्या म्हणाल्या. दरम्यान सर्वश्री आशुतोषजी महाराज हे आम्हा सर्वांचे गुरू असून त्यांनी दिलेली शिकवण आमच्या जीवनाचे सार्थक करण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास सुश्री अन्नपूर्णा भारतीजी यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरूचरणी विविध भजने सादर करण्यात आली. टाळ तसेच संगीताच्या स्वरध्वनीवर गुरू पोर्णिमा उत्सव व सभागृह अक्षरश: मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व आरती करण्यात आली. व्यासपीठावर सुश्री लक्ष्मी भारतीजी, सुश्री धनश्री भारतीजी आदी उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित साधक व भक्त टाळ्यांच्या गजरामध्ये भजनात सहभागी झाले होते. परळीसह अंबाजोगाई, सोनपेठ, गंगाखेड, नांदेड, सिरसाळा,माजलगाव, कळंब, केज, लातूर आदी ठिकाणाहून भाविकांची अलोट गर्दी या सत्संग सोहळयास लाभली होती. गुरूपोर्णिमेच्या या कार्यक्रमामुळे परळी शहरात धार्मिकतेचे भरगच्च वातावरण दिसून येत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिव्य ज्योति जागृती संस्थानच्या परळी शाखेच्या सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमातून उपस्थित भाविकांनी अध्यात्मिक समाधान व गुरूसेवेचा प्रसाद घेवून आनंद व्यक्त केला.

# बीड जिल्हयातून बदलून गेलेल्या अधिकाऱ्यांचा ही येथील लोक जिव्हाळा ठेवतात-प्रा.ईश्वर मुंडे

## अधिवेशनादरम्यान नवल किशोर राम व प्रा.ईश्वर मुंडे यांची भेट

**मुंबई (प्रतिनिधि)**-बीड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती व शेती अधारीत उत्पन्न कमी आसले तरी बीड जिल्ह्यातील लोक कष्टाळू,मेहनती तेवढेच प्रेमळ आहेत.बीड जिल्ह्यात अधिकारी म्हणून आलेल्या प्रमाणीक अधिकाऱ्यांना सहकार्य व प्रेम देऊन त्यांना डोक्यावर घेतात याची अनेक उदाहरणे घडलेले आहेत.

या मध्ये महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार,सेच्छा सेवानिवृत्त विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर तसेच नवल किशोर राम,आशोक धिवरे,अखिलेश कुमार या आय.ए.एस. व आय.पी.एस.अधिकाऱ्यांची नावे सर्व जिल्हावाशीयांच्या मनात व ओठांवर आहेत. सध्या महाराष्ट्र राज्याचे पावसाळी अधिवेशन



विधान भवन मुंबई येथे चालू आहे.या अधिवेशनादरम्यान स्वेच्छा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी व सध्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे नेते प्रा.ईश्वर मुंडे व पुणे महानगर पालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांची भेट झाली.उभयतांनी स्मीत हास्य,प्रेमाणे हस्तांदोलन केले.बीड जिल्ह्यातील विविध विषयांवर थोडक्यात चर्चा केली.बीड जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी बीड जिल्ह्यात नाविन्यपूर्ण काम केले होते.त्यांची बीड नंतर जिल्हाधिकारी संभाजीनगर,जिल्हाधिकारी पुणे,पंतप्रधान कार्यालय दिल्ली येथे बदली झाली.आता ते पुणे महानगर पालिकेचे आयुक्त आहेत.प्रा.ईश्वर मुंडे व नवल किशोर राम यांची भेट म्हणजे अधिकारी बीड जिल्ह्यातून बदलून गेले तरी जिल्हयातील लोक आठवणी,प्रेम व जिव्हाळा कायम ठेवतात हेच सिध्द होते.

# श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**केज( प्रतिनिधी)**-तालुक्यातील प्रतिदेहु श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.गुरूवर्य महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली गरूपोर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा गाभारा हजारो विड्याच्या पानांनी सजवण्यात आला. संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमे निमित्त आलेल्या भक्तांनी संत तुकाराम महाराजांच्या दर्शना बरोबरच गुरूवर्य महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे आशीर्वादही घेतले. याप्रसंगी महंत



महादेव महाराज बोराडे शास्त्री यांची किर्तन सेवा संपन्न झाली. पावनधाम येथे आलेल्या हजारो भाविकांच्या प्रसादाची व्यवस्था सौ.स्मिता चंद्रकांत लोमटे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल महाराज ,अशोक महाराज ,जनार्धन महाराज,सिरसट महाराज, प्रशांत महाराज निगडे,गणेश महाराज भगत, शाम महाराज भिसे,गोविंद शिनगारे आणि सर्व स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.

# जनसुरक्षेच्या नावाखाली अघोषित हुकुमशाही-ॲड.श्रीनिवास बेदरे

**गेवराई (वार्ताहार):** महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ (विधानसभा विधेयक क्रमांक ३३) हे महाराष्ट्रातील नागरिकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे आणि लोकशाही मूल्यांचे उल्लंघन करणारे विधेयक आहे असे मत बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी केले आहे.पुढे बोलताना अँड बेदरे म्हणाले संयुक्त समितीच्या अहवालातून हे स्पष्ट झाले आहे की, हे विधेयक केवळ दिखाव्यासाठी सुधारित केले गेले आहे. परंतु त्याची मूलभूत दडपशाही करणारी कलमे तशीच आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा: हे विधेयक कोणतीही टीका किंवा सार्वजनिक आंदोलन सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी धोकादायक मानले जाऊ शकते. याचा अर्थ असा की, कोणताही निषेध किंवा विरोधी मत व्यक्त करणे हा गुन्हा ठरू शकतो. राजकीय विरोधकांना लक्ष्य: हा कायदा राजकीय विरोधकांना, कार्यकर्त्यांना, लेखकांना आणि सरकारसाठी गैरसोयीचे असलेल्या कोणत्याही व्यक्तीला लक्ष्य करण्यासाठी वापरला जाऊ शकतो. हे विधेयक महाराष्ट्राला हुकूमशाहीकडे घेऊन जाईल अशे प्रतिपादन युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.या दडपशाही कायद्याचा बीड जिल्हा युवक काँग्रेस कमिटीचा वतीने निषेध करतो.

# भगवान विद्यालयाच्या एन सी सी कॅडेटची यशस्वी कामगिरी

**बीड (प्रतिनिधी):**एमआयसी व एस अहिल्यानगर येथे ५१ महाराष्ट्र बटालियन एन सी सी छ. संभाजीनगर आयोजित उ-ढउ -२१६ कॅम्प दि २५ जून २०२५ ते ०४ जुलै २०२५ या कालावधीत संपन्न झाला.

या कॅम्प मध्ये एकूण ४३० कॅडेट सहभागी होते.भगवान विद्यालय बीड चे एन सी सी ऑफिसर नितीन जाधव व २१ कॅडेट सहभागी होते. कॅम्प मध्ये पी टी, ड्रिल,मॅप रिडींग, वेपन ट्रेनिंग चे प्रशिक्षण कॅडेट ने खुप उत्साही होऊन पूर्ण केले. एन सी सी ऑफिसर यांनी प्रोसायडींग ऑफिसर व कंपनी कमांडर चे कार्य यशस्वी पार पाडले.वेपन फायरिंग मध्ये कॅडेट ने विशेष कामगिरी केली. कमांडिंग ऑफिसर यांने



भगवान विद्यालयाच्या कॅडेटचे विशेष कौतुक केले.

या यशस्वी कामगिरीबद्दल सर्व कॅडेट आणि त्यांचे मार्गदर्शक एन सी सी ऑफिसर श्री. नितीन जाधव सर यांचे संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष मा. श्री गो. गो. मिसाळ सर, सचिव माननीय डॉक्टर श्री अनिलकुमार सानप साहेब, कोषाध्यक्षा डॉ वृषालीताई सानप मॅडम व सर्व सन्माननीय संचालक तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री आघाव सर ,उपमुख्याध्यापक श्री गर्जे सर, पर्यवेक्षक श्री ढोकर सर , सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री डोळे सर यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# विज्ञान शिक्षक, युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षण शिबीराचा समारोप

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**-मराठी विज्ञान परिषद, पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र, योगेश्वरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षण कार्य शाळा, शनिवारी विज्ञानवारी अंतर्गत युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षणाचा रविवारी समारोप करण्यात आला.अध्यक्षस्थानी म.वि. परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे सचिव प्रा. भीमाशंकर शेटे होते. मंचावर म.वि.परिषद मुंबईचे पदाधिकारी प्रकाश मोडक, अभय यावलकर, मनस्विनी प्रकल्पच्या प्रा.अरुंधती पाटील,प्रा.अनिल नरसिंगे होते.

यावेळी बोलताना प्रकाश मोडक यांनी सांगितले की, मराठी विज्ञान परिषद ही विज्ञानाच्या प्रसार व प्रचाराचे काम करते शनिवारी विज्ञानवारीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन विज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावे जेणे करून विज्ञान त्यांच्या जगण्यात येऊन त्याचा प्रचार,प्रसार वेगाने होईल.अभय यावलकर म्हणाले की,चांगले पेरले तर चांगले उगवते तसे विज्ञान विषयाचे काम आहे.प्रत्येक गोष्टीत विज्ञान आहे पण ते विद्यार्थ्यांनी चिकित्सक पद्धतीने पाहून त्याचा संशोधक वृत्तीने अभ्यास करणे गरजेचे आहे.अरुंधती पाटील यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षणा साठी परिश्रम घेण्याऱ्यांचे स्वागत करण्यात आले.पू.बाबासाहेब परांजपे यांच्या मार्गदर्शनातून योगेश्वरी विज्ञान महाविद्यालयाची स्थापना झाली आणि ग्रामीण भागात विज्ञानाचा प्रसार प्रचार होऊ लागला विद्यार्थी शिकु लागले.

विज्ञान विषयाची गोडी निर्माण करण्याची निकड लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी विद्यालयात शनिवारी विज्ञान वारी अंतर्गत अध्यापन करावे असे मत अध्यक्षीय समारोपात प्रा.भीमाशंकर शेटे यांनी केले.प्रशिक्षण घेतलेले युवा विज्ञान प्रसारक हे जानेवारी २०२६ पर्यंत विविध विद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे अध्यापन करणार आहेत.संचालन आदित्य कदम तर आभार हेमंत धानोरकर यांनी मानले. दि.०३ ते ०५ जुलै या कालावधीतील विज्ञान शिक्षक,प्रयोग शाळा सहाय्यक यांच्या कार्यशाळेत २९ शिक्षक तर दि.०५ व ०६ जुलै रोजी संपन्न झालेल्या युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षण शिबीरात ९० विद्यार्थी उपस्थित होते. या दोन्ही उपक्रमासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,उपाध्यक्ष जी.बी.व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ऍड. जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य यांचे मार्गदर्शन लाभले.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077